Exh.01

**अहमदनगर येथील मे.चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब अहमदनगर यांचे कोर्टात :-**

**क्रि. केस नं.**

3544 /२०२५

**फिर्यादी**

सौ.संगिता सुनिल देशपांडे
वय ५८ वर्षे धंदा-व्यवसाय
रा.स्मृती कॉलनी, आगरकरमळा,
स्टेशनरोड,अहिल्यानगर
मो.नं. ९४०३३७३१७९

**आरोपी**

१) श्री.महेश सुधाकर कुलकर्णी,
वय ४५ वर्षे धंदा- नोकरी
पुर्णवाद नागरी सह. पतसंस्था मर्या.
शिरसोली,जळगाव,शाखा
अहिल्यानगर,करण कोर्ट शॉप नंबर
२०४, जुने जिल्हा न्यायालया
समोर, अहिल्यानगर चे व्यवस्थापक
मो.नं.९४२३१६६२९३

२) श्री.सत्यशिल अविनाश अकोले
वय ७२ वर्षे,धंदा-व्यवसाय
पुर्णवाद नागरी सह.पतसंस्था मर्या.
शिरसोली,जळगाव, चे चेअरमन,
सि.स.नंबर ८३१३, पुर्णवाद भवन
पुर्णवादनगर,रिंगरोड,
ता.जि. जळगांव

**फिर्याद:-निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कायदा कलम १३८ प्रमाणे.**

**या कामी फिर्यादी कळविते ते खालील प्रमाणे :-**

१) चेक देणाराचे नांव:- पुर्णवाद सह.पतसंस्था मर्या.करीता
चेअरमन सत्यशिल अविनाश अकोले

२) आरोपीच्या चेकची बँक:- आर बी एल बँक लि.

शाखा चिंचोली बँक ता.जि.जळगाव

| | | |
|---|---|---|
| ३) | चेक नंबर,तारीख वः- रक्कमः- | चेक नं.०००१०४ रक्कम रु. ३,००,०००/- तारीख ३०/११/२०२४ |
| ४) | फिर्यादीची बँक :- | भारतीय स्टेट बँक मुख्या शाखा अहिल्यानगर |
| ५) | चेक भरला तारीखः- | ता. २८/०१/२०२५ |
| ६) | चेक परत आल्याची ता.:- | ता.३०-०१-२०२५ |
| ७) | चेक न वटण्याचे कारणः- | फंडस इन सफिशियंट |
| ८) | फिर्यादीने आरोपीस नोटीस दिलेची तारीखः- | तारीख १०/०२/२०२५ |
| ९) | आरोपीस नोटीस मिळालेची तारीख | आरोपी नं. १ ला ११/०२/२०२५ व आरोपी नं. २ ला १२/०२/२०२५ रोजी मिळाली |
| १०) | पोलीस स्टेशन हद्द :- | कोतवाली पोलीस स्टेशन, अहिल्यानगर. |
| ११) | गुन्हा घडल्याचे कारण व दिनांकः- | चेक न वटता ता.२९/०१/२०२५ रोजी परत आला व आरोपीस नोटीस मिळूनही नोटीसमध्ये नमुद मुदतीत चेकची रक्कम दिली नाही.तेंव्हा व त्यानंतर नित्य घडत आहे. |

१) फिर्यादी हे वरील ठिकाणचे रहिवाशी आहेत. पुर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. शिरसोली, जळगांव ही पतसंस्था सहकार कायदा १९६० अन्वये स्थापन झालेली असून तिचा **नोंदणी क्रमांक जे.जी.ए./जे.जी.ए/आर.एस.आर./सी.आर./२२१/२१०/२००० दि.१८/१०/२०००** असा असून संस्थेचे मुख्य कार्यालय ६९-७२ युनिटी चेंबर्स गणेश कॉलनी रोड जळगांव येथे आहे. सदर

संस्थेचे जळगांव जिल्हयासह महाराष्ट्रातील इतर जिल्हयात शाखा असून सदर पतसंस्थेची अहमदनगर येथे देखील शाखा आहे. आरोपी नंबर १ हे सदर पतसंस्थेचे अहमदनगर शाखेचे व्यवस्थापक असून आरोपी नंबर २ हे सदर संस्थेचे चेअरमन म्हणुन कामकाज पहात आहेत. पतसंस्थेचे दैनंदीन व्यवहारावर पुर्ण पणे आरोपी यांचे नियंत्रण असून आरोपी हेच सर्व व्यवहारास चेअरमन व व्यवस्थापक या नात्याने जबाबदार आहेत. तसेच सदरील पतसंस्थेचा कारभार सहकारी संस्थांचा कायदा १९६० चे कायदयानुसार तसेच पोट नियमानुसार चालतो. सदर पतसंस्थे मार्फत लोकांकडून ठेवी गोळा करणे बचत स्विकारणे, मुदत ठेवी स्विकारणे व त्याच्या मुदती पुर्ण झाल्यानंतर सव्याज परत करणे गरजु लोकांना त्यांचे मागणी प्रमाणे कर्ज देणे,इत्यादी बँकींग व्यवहार केले जातात. पतसंस्थेच्या वतीने आरोपी नंबर १ व्यवस्थापक यांनी फिर्यादीस समक्ष भेटून पतसंस्थेत मुदत ठेवीवर आकर्षक व्याज दिले जाते असे अमिष दाखवून पतसंस्थेमध्ये फिर्यादीस ठेवी ठेवण्यास तसेच रिकअरींग व बचत खाते उघडण्यास फिर्यादीस भाग पाडले.

२) फिर्यादी यांनी आरोपींच्या पतसंस्थेच्या अहिल्यानगर येथील शाखेत स्वतःचे नांवे व पती व सासु यांच्या नांवे मुदत ठेवी, बचतखाते व रिकअरींग ठेव ठेवली होती. मुदत ठेवी ,बचत खाते व रिकरींगमध्ये फिर्यादी व त्यांचे पती व सासु यांनी एकुण रुपये ५५,१७,३६७/- वेळोवेळी ठेवलेले आहेत. मुदत ठेव पावत्यांची मुदत संपल्या नंतर फिर्यादी यांनी आरोपी नंबर १ यांच्याकडे मुदत ठेव पावत्या तसेच खात्यातील व आर डी चे रकमेची मागणी केली असता फिर्यादीस रक्कम देवू दिलावू करुन देण्याची टाळाटाळ केली. अनेक वेळा आरोपी

नंबर १ व २ यांच्याकडे सदर रक्कमेची मागणी केली असता आरोपी नंबर २ यांनी अहमदनगर येथील शाखेत येवून फिर्यादींच्या रक्मांपोटी पतसंस्थेचे खाते असलेला आर बी एल बँक लि. शाखा चिंचोली या बँकेचा दिनांक ३०/११/२०२४ रोजीचा धनादेश क्रमांक ०००१०४ चा रक्कम रुपये ३,००,०००/-(तीन लाख रुपये मात्र) फिर्यादीस चेअरमन या नात्याने सही करुन दिला व तो निश्चीत वटविला जाईल असा विश्वास व भरोसा फिर्यादी यांना दिलेला होता व आहे. त्या प्रमाणे फिर्यादीने आरोपी यांचेवर विश्वास ठेवून सदरचा धनादेश स्विकारला. व तो आरोपी यांचे सांगणे प्रमाणे फिर्यादीने त्यांचे खाते असलेले भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा अहमदनगर या बँकेत दिनांक २८/०१/२०२५ रोजी भरला असता सदरचा चेक मेमोसह दिनांक ३०-०१-२०२५ रोजी न वटता **फंडस इनसफिशियंट** असा शेरा मारुन परत आलेला आहे व फिर्यादीस चेकची रक्कम मिळाली नाही. म्हणुन फिर्यादी यांनी आरोपींना तारीख १०/०२/२०२५ रोजी वकिला मार्फत नोटीस पाठवून चेकची रक्कम नोटीस मिळाले पासून १५ दिवसात अदा करण्याचे कळविले असता सदरची नोटीस आरोपी नंबर १ यास दिनांक ११/०२/२०२५ व आरोपी नंबर २ यास दिनांक १२/०२/२०२५ रोजी मिळूनही चेकची रक्कम मुदतीत दिली नाही.

३) अशा प्रकारे आरोपी नंबर १ व २ पतसंस्थेचे व्यवस्थापक व चेअरमन म्हणुन जबाबदार व्यक्ती असतांना पतसंस्थेच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही या बाबतची आरोपींना माहिती व जाणीव असूनही आरोपींनी जाणीव पुर्वक सदरचा न वटणारा चेक देवून फिर्यादीची फसवणुक केलेली आहे व आरोपींनी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला आहे.

४) सबब मे. कोर्टास नम्र विनंती की, आरोपींनी निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे गुन्हा केलेला असल्याने आरोपींना वरील कलमान्वये जास्तीत जास्त कडक शासन व दंड करावा व दंडाच्या रक्कमेतुन फिर्यादीस चेकची रक्कम नुकसान भरपाई म्हणुन देण्याचा मे. कोर्टाचा हुकुम व्हावा ही विनंती.

१) शाखाधिकारी,
आर बी एल बँक लि. शाखा चिंचोली ता.जि.जळगांव
(साक्षीस येतांना आरोपीचे खात्यावरील चेक नंबर ०००१०४ डिसऑनर झाले या संबंधीची सर्व मुळ कागदपत्रे,रजिस्टर्स घेवून साक्षीस यावे.)

२) शाखाधिकारी,
भारतीय स्टेट बँक मुख्य शाखा अहमदनगर
(साक्षीस येतांना फिर्यादीचे खात्यावरील चेक नंबर ०००१०४ दि ३०/०१/२०२५ रोजी डिसऑनर झाले या संबंधीची सर्व मुळ कागदपत्रे,रजिस्टर्स घेवून साक्षीस यावे.)

या शिवाय जादा साक्षीपुरावा देण्याचे गरजेचे वाटल्यास फिर्यादीस परवानगी असावी.

येणे प्रमाणे फिर्याद असे.

तारीख १८-०३-२०२५

अहमदनगर

S.S. Deshpande

फिर्यादी

**S.C.C.No.3544/2025**

**Sangita Sunil Deshpande**
**Vs**
**Mahesh Sudhakar Kulkarni**

## ORDER BELOW EXH.1

Read the complaint. Heard the learned counsel for the complainant. By virtue of Section 4(2) of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023, being special Act, the procedure prescribed under Section 142 of The Negotiable Instruments Act, 1881 i.e. taking cognizance of such offence on affidavit is applicable and not the proviso of Section 223(1) of The B.N.S.S., 2023 i.e. opportunity of hearing to the accused be given before taking the cognizance of offence. The complainant has submitted the affidavit. Perused the affidavit and documents on record. From the record, prima facie sufficient grounds appears for proceeding against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881. Resultantly, the following order :

## O R D E R

1. Issue process against the accused under Section 227 of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

2. Issue summons to the accused in regular mode as well as by R.P.A.D.

3. Hamdast be given to the complainant for service of summons, if required.

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN

( **Maya A. Deshmukh** )
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.06) Ahmednagar

Date : 08.04.2025